निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
बुधवार
२५ फेब्रुवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३६० वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## छत्रपती संभाजीनगरमध्ये लाचखोर ग्रामसेवकाचा माज उतरवला!

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी**/'लोका सांगे ब्रह्मज्ञान आणि स्वतः कोरडे पाषाण' या उक्तीप्रमाणे वागणाऱ्या एका भ्रष्टाचारबाधित ग्रामसेवकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) मंगळवारी जोरदार दणका दिला. पाणीपुरवठा आणि घनकचरा व्यवस्थापनाच्या बिलाचे **'बक्षीस'** म्हणून चक्क २० हजार रुपयांची लाच मागणाऱ्या राजोबा विठोबा काथार या ५० वर्षीय ग्रामसेवकाला १० हजार रुपये घेताना रंगेहात पकडण्यात आले आहे.

**१० हजारांची लाच घेताना एसीबीच्या जाळ्यात**



तक्रारदार हे एका ठेकेदाराकडे नोकरीस आहेत. मौजे रहाळपट्टी तांडा (जटवाडा) येथे ग्रामनिधी योजनेअंतर्गत पाणीपुरवठा आणि घनकचरा व्यवस्थापनाची कामे करण्यात आली होती. या कामांचे बिल ठेकेदाराला अदा केल्याच्या बदल्यात, आरोपी ग्रामसेवक राजोबा काथार याने तक्रारदाराकडे 'बक्षीस' म्हणून २०,००० रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. तडजोडीनंतर १०,००० रुपये देण्याचे ठरले.

**टी.व्ही. सेंटरमधील हॉटेलमध्ये पडला सापळा**

भ्रष्टाचाराला कंटाळलेल्या तक्रारदाराने १६ फेब्रुवारी २०२६ रोजी एसीबीकडे धाव घेतली होती. या तक्रारीची पडताळणी केल्यानंतर, आज २४ फेब्रुवारी रोजी छत्रपती संभाजीनगरमधील टी. व्ही. सेंटर भागातील 'दादा डोसा' या हॉटेलमध्ये सापळा रचण्यात आला. या ठिकाणी तक्रारदाराकडून १०,००० रुपये स्वीकारताच दबा धरून बसलेल्या एसीबीच्या पथकाने काथारला झडप घालून ताब्यात घेतले.

**एसीबीची धडक कारवाई आणि घरझडती**

या कारवाईनंतर लाचखोर ग्रामसेवकाच्या वसंतनगर, जाधववाडी येथील निवासस्थानाची झडती घेण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करण्यात आली आहे. आरोपीविरुद्ध सिडको पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम उशिरापर्यंत सुरू होते.

**कारवाई करणारे 'शूरवीर' पथक**

ही धडाकेबाज कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे आणि अपर पोलीस अधीक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

सापळा अधिकारी: पोलीस निरीक्षक शांतीलाल चव्हाण,सहकार्य: पोलीस निरीक्षक राजू नांगलोत, रवींद्र काळे, अशोक नागरगोजे, विलास चव्हाण आणि रामेश्वर ताठे.

**भ्रष्टाचाऱ्यांची आता खैर नाही!**

सरकारी कामासाठी कोणीही लाचेची मागणी केल्यास घाबरू नका. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी खालील क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.टोल फ्री क्रमांक: १०६४ ,व्हॉट्सअप क्रमांक: ७७२०८९१०६४ व फोन: ०२४०-२३४४०५०.

## संदीपान भुमरेंचा समृद्धी महामार्गात ११५० कोटींचा 'जमीन घोटाळा'?

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** राज्याच्या राजकारणात सध्या एका नव्या जमीन घोटाळ्याने मोठी खळबळ उडवून दिली आहे. शिवसेना (णइढ) नेते आणि विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी शिंदे गटाचे खासदार संदीपान भुमरे यांच्यावर थेट ११५० कोटी रुपयांच्या जमीन घोटाळ्याचा गंभीर आरोप केला आहे. आपल्याच ड्रायव्हरच्या नावे बनावट 'हिबानामा' (बक्षीस पत्र) करून कोट्यवधींची जमीन हडपल्याचा दावा दानवे यांनी केल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

**नेमका काय आहे घोटाळा?**

अंबादास दानवे यांनी पत्रकार परिषदेत दिलेल्या माहितीनुसार, जटवाडा परिसरातील २३ एकर ३० गुंठे जमिनीचा हा संपूर्ण व्यवहार संशयाच्या भोवऱ्यात आहे.**ड्रायव्हरच्या नावे जमीन:** ही जमीन संदीपान भुमरे यांचे ड्रायव्हर जावेद रसूल शेख यांच्या नावे 'हिबानामा'द्वारे करण्यात आली आहे.**काळाचा मोठा घोळ:** धक्कादायक बाब म्हणजे, हा हिबानामा १९७१ साली झाल्याचे कागदोपत्री दाखवण्यात आले आहे. मात्र, दानवे यांनी पुराव्यासह दावा केला आहे की, ज्याच्या नावे ही जमीन झाली, त्या जावेद रसूल शेखचा जन्मच मुळी १९८५ मध्ये झाला आहे!सवाल: ज्याचा जन्मच झाला नव्हता, त्याच्या नावावर १९७१ मध्ये जमीन कशी काय बक्षीस दिली जाऊ शकते? असा जळजळीत सवाल दानवे यांनी उपस्थित केला आहे.

**समृद्धी महामार्ग आणि ११५० कोटींचा आकडा**

ही जमीन नुसती जमीन नसून, समृद्धी महामार्गाच्या संपादनात आलेली मोक्याची जागा आहे.


१.संपादित मूल्य: महाराष्ट्र विकास मंडळाने ही जमीन संपादित केली असून, त्याचे मोबदला मूल्य तब्बल ११५० कोटी रुपये निश्चित करण्यात आले आहे.

२.मालकी हक्काचा खेळ:इतक्या अवाढव्य रकमेवर डोळा ठेवूनच सत्तेचा गैरवापर करून कागदपत्रांची फेरफार करण्यात आल्याचा आरोप दानवेंनी केला आहे.

**अंबादास दानवेंचा पुराव्यांसह खळबळजनक आरोप!**

**धक्कादायक!**

**'ही तर सीआयडी चौकशीच हवी' - दानवेंची आक्रमक मागणी**



या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता अंबादास दानवे यांनी थेट मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून या संपूर्ण प्रकरणाची CID (गुन्हे अन्वेषण विभाग) मार्फत चौकशी करण्याची मागणी केली आहे. जर सखोल चौकशी झाली, तर भुमरेंचे काळे कारनामे आणि बनावटगिरी चव्हाट्यावर येईल, असेही ते म्हणाले.

**भुमरेंचे 'क्लीन चिट'चे दावे: तो जावेद दुसराच असेल!**

दुसरीकडे, खासदार संदीपान भुमरे यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. त्यांनी अत्यंत सावध पवित्रा घेत म्हटले की,अंबादास दानवे यांना सगळीकडे मीच दिसतो. माझ्यावर केलेले आरोप पूर्णपणे बिनबुडाचे आहेत. जावेद रसूल नावाचा माझा ड्रायव्हर आहे हे खरे, पण त्याचा या जमिनीशी काहीही संबंध नाही. ज्या जावेदचा उल्लेख दानवे करत आहेत, तो कदाचित दुसरा कोणीतरी असेल. दानवेंनी हे आरोप सिद्ध करून दाखवावेत.

**राजकीय संघर्षाची ठिणगी**

या आरोप-प्रत्यारोपामुळे छत्रपती संभाजीनगरमधील राजकीय वातावरण तापले आहे. एका बाजूला पुराव्यांची लढाई आणि दुसऱ्या बाजूला 'राजकीय सूडबुद्धी'चा दावा, यामुळे हा ११५० कोटींचा पेच आता न्यायालयापर्यंत किंवा चौकशी समितीपर्यंत पोहोचणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सरकारचा मराठा समाजाला पुन्हा 'तारीख पे तारीख'!

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर राज्य सरकारने पुन्हा एकदा वेळकाढूपणाचे धोरण अवलंबल्याचे स्पष्ट झाले आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर **'हैदराबाद गॅझेटियर'** लागू करून मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याचे आश्वासन हवेतच विरले असून, सहा महिने उलटूनही अद्याप याची कार्यपद्धती (SOP) निश्चित झालेली नाही. धक्कादायक बाब म्हणजे, आता सरकारकडून नवी समिती स्थापन करण्यात आली असून, प्रशासकीय दिरंगाईचा फटका लाखो मराठा तरुणांना बसत आहे.

प्रशासकीय उदासीनता की राजकीय खेळी?

सरकारने २० फेब्रुवारी रोजी काढलेल्या आदेशात स्वतःच कबूल केले आहे की, कार्यपद्धती निश्चित नसल्यामुळे कुणबी प्रमाणपत्रांसाठी अर्ज कमी येत आहेत आणि वाटपही अत्यल्प झाले आहे. प्रश्न असा उपस्थित होतो की, ज्या मुद्द्यावर अख्खा महाराष्ट्र पेटून उठला होता, त्यावर कार्यपद्धती ठरवण्यासाठी सरकारला सहा महिने का लागली? ही केवळ उदासीनता आहे की जाणीवपूर्वक केलेला विलंब, असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे.

विभागीय आयुक्तांच्या खांद्यावर जबाबदारी, पण तोपर्यंत काय?

आता छत्रपती संभाजीनगरच्या विभागीय आयुक्तांच्या देखरेखीखाली एक नवीन समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती हैदराबाद गॅझेटियरच्या आधारे सविस्तर डजझ तयार करेल.प्रक्रिया: समिती डजझ तयार करणार ड़ीळसहींरीु सरकारकडे पाठवणार ड़ीळसहींरीु सरकार मंजुरी देणार ड़ीळसहींरीु मग प्रमाणपत्र मिळणार.वास्तव: या लांबलचक प्रक्रियेत मराठा समाजाचा तरुण मात्र आरक्षणावाचून शैक्षणिक आणि नोकरीच्या संधी गमावत आहे.

आकडेवारीतून सरकारच्या अपयशाचा पंचनामा

डिसेंबर २०२५ पर्यंतची आकडेवारी पाहिल्यास सरकारचा दावा किती फोल आहे हे स्पष्ट होते:

मराठवाड्याची स्थिती:

आलेले एकूण अर्ज: ५९४

मिळालेली प्रमाणपत्रे:फक्त ९८

आठ जिल्ह्यांतून केवळ ९८ जणांना प्रमाणपत्र मिळणे, हे प्रशासकीय यंत्रणेचे सर्वात मोठे अपयश मानले जात आहे. यावर मनोज जरांगे पाटील यांनीही तीव्र नाराजी व्यक्त केली असून, सरकार केवळ कागदी घोडे नाचवत आहे, अशी टीका केली आहे.

विखे-पाटील गप्प का?

मराठा आरक्षणासंदर्भातील मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी या दिरंगाईवर मौन बाळगल्याने संताप व्यक्त होत आहे. सरकारने दिलेला शब्द पाळला नाही, मग आता नवीन समित्यांचा फार्स कशासाठी? असा सवाल सामाजिक कार्यकर्त्यांनी विचारला आहे.

एकीकडे आरक्षणाची लढाई न्यायालयात आणि रस्त्यावर सुरू असताना, दुसरीकडे प्रशासकीय पातळीवर होणारी ही दिरंगाई मराठा समाजाच्या जखमेवर मीठ चोळणारी आहे. नवीन समिती स्थापन करून सरकारने पुन्हा एकदा चेंडू प्रशासनाच्या कोर्टात ढकलला आहे. आता ही समिती किती लवकर 'कार्यपद्धती' निश्चित करते आणि प्रत्यक्षात किती मराठ्यांना न्याय मिळतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

## २ मार्चला लोकशाही दिनाचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन महिन्याचे पहिल्या सोमवारी करण्याबाबत निर्देश आहेत. तरी जालना जिल्ह्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार दि. २ मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.लोकशाही दिनाकरीता अर्जदार यांनी अर्ज विहीत नमुन्यात १५ दिवस आधी २ प्रतीत पाठवणे आवश्यक आहे. या लोकशाही दिनामध्ये अर्ज देताना त्यांनी संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व या तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झाली नाही, अशाच अर्जदाराने टोकन क्रमांकाच्या पावतीसह विहीत नमुन्यात दोन प्रतीमध्ये अर्ज सादर करावा. ज्या अर्जदाराने तालुकास्तरीय लोकशाही दिनात भाग घेतला नाही, अशा अर्जदाराचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत, असे जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांचे कार्यालयाकडुन सुचित करण्यात येत आहे. लोकशाही दिनात न्याय प्रविष्ट प्रकरणे, राजस्व,अपील, सेवाविषयक आस्थापनाविषयक बाबी, विहीत नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाशी तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोच पावती तसेच त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापुर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल.

ज्यांनी त्यापुर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे. परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नये. तसेच लोकशाही दिन विहीत नमुन्याचा अर्ज http://jalna.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. असेही कळविले आहे.

## जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांची परीक्षा केंद्रांना अचानक भेट; 'कॉपीमुक्त' अभियानाचा घेतला आढावा

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**/ राज्यात सध्या उच्च माध्यमिक शालांत परीक्षेचा (इयत्ता १२ वी) माहोल असून, परीक्षा अत्यंत पारदर्शक आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडाव्यात यासाठी प्रशासन सतर्क झाले आहे. याच पार्श्वभूमीवर, आज जिल्हाधिकारी तथा जिल्हा दक्षता समितीचे अध्यक्ष दिलीप स्वामी यांनी शहरातील विविध परीक्षा केंद्रांना अचानक भेटी देऊन पाहणी केली.आज इयत्ता १२ वीचा अर्थशास्त्र विषयाचा पेपर होता. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष वर्गांमध्ये जाऊन व्यवस्थेची पाहणी केल्याने केंद्र चालकांची चांगलीच धावपळ उडाली.



जिल्हाधिकारी स्वामी यांनी सिडको आणि चिकलठाणा भागातील प्रमुख केंद्रांना भेटी दिल्या.१. पद्मश्री वसंतदादा पाटील उच्च माध्यमिक विद्यालय, सिडको.२. न्यू हायस्कूल व उच्च माध्यमिक विद्यालय, चिकलठाणा.सुविधा आणि गोपनीयतेचा घेतला आढावा पाहणी दरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी केवळ वरवरची तपासणी न करता परीक्षा संचालनाच्या प्रत्येक बारकाव्यावर लक्ष केंद्रित केले. त्यांनी खालील बाबींचा सविस्तर आढावा घेतला.सीसीटीव्हीवर लक्ष: केंद्रांवर कार्यान्वित असलेली सीसीटीव्ही यंत्रणा, त्यातील फुटेजची स्टोरेज व्यवस्था आणि नियंत्रण प्रणालीची त्यांनी तांत्रिक तपासणी केली.गोपनीयता आणि शिस्त: प्रश्नपत्रिकांची हाताळणी, उत्तरपत्रिकांची सुरक्षा आणि परीक्षा दालनातील आसनव्यवस्था यांत पारदर्शकता पाळली जात असल्याची खात्री त्यांनी केली.विद्यार्थ्यांच्या सुविधा: परीक्षार्थींना पेपर लिहिताना कोणताही त्रास होऊ नये यासाठी वर्गातील उजेड, खेळती हवा आणि पिण्याच्या पाण्याची उपलब्धता याचीही त्यांनी स्वतः खात्री केली. परीक्षा केंद्रांवरील शांतता आणि विद्यार्थ्यांची एकाग्रता पाहून जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी तणावमुक्त वातावरणात परीक्षा द्यावी आणि प्रशासनाने 'कॉपीमुक्त' परीक्षेसाठी दिलेले नियम काटेकोरपणे पाळावेत, अशा सूचना त्यांनी यावेळी केंद्र प्रमुखांना दिल्या. जिल्हाधिकाऱ्यांच्या या 'सरप्राईज व्हिजिट'मुळे परीक्षा यंत्रणेतील अधिकारी आणि कर्मचारी अधिक सतर्क झाले असून, संपूर्ण जिल्ह्यात परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे दिसून येत आहे.

## राजूर येथे २८ फेब्रुवारीला 'शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा'

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** सामान्य नागरिकांच्या शासकीय अडचणी तातडीने सुटाव्यात आणि शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ थेट जनतेच्या पदरात पडावा, या उद्देशाने जालना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने पुढाकार घेतला आहे. येत्या शनिवार, दि. २८ फेब्रुवारी रोजी भोकरदन तालुक्यातील राजूर येथे भव्य 'शासकीय सेवा व योजनांच्या महामेळाव्याचे' आयोजन करण्यात आले आहे. या महामेळाव्यात एकाच ठिकाणी ३० हून अधिक शासकीय विभागांचे स्टॉल्स असणार आहेत.

या मेळाव्याचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती तथा जालना जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती अरुण आर. पेडणेकर यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून न्यायमूर्ती सुशील मनोहर घोडेस्वार उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश वर्षा एम. मोहिते असतील. याप्रसंगी जिल्ह्यातील उच्चपदस्थ अधिकारी आणि मान्यवरांची मांदियाळी पाहायला मिळणार आहे, ज्यात प्रामुख्याने:

आशिमा मित्तल (जिल्हाधिकारी), अजय बन्सल (पोलीस अधीक्षक), शिरीष बनसोडे (प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी) ॲड. बाबासाहेब इंगळे (जिल्हा सरकारी अभियोक्ता) ॲड. अनिरुद्ध घुले पाटील (अध्यक्ष, जिल्हा वकील संघ) ॲड. रवींद्र पाटील (अध्यक्ष, भोकरदन तालुका वकील संघ)

एकाच ठिकाणी मिळणार ३० विभागांच्या सेवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव नितेश एम. बंडगर यांनी दिलेल्या माहितीनुसार, या मेळाव्यात नागरिकांच्या सोयीसाठी किमान ३० शासकीय विभागांचे स्टॉल्स उभारले जातील. यामध्ये प्रामुख्याने:

महसूल विभाग: दाखले व जमिनीशी संबंधित तक्रारी,कृषी विभाग: शेतीविषयक योजना व अनुदानाची माहिती,आरोग्य विभाग: मोफत तपासणी व आरोग्य कार्ड.,समाजकल्याण: विविध सामाजिक योजनांचे अर्ज.इतर: पोलीस प्रशासन, महावितरण, शिक्षण आणि परिवहन विभागांचे स्वतंत्र कक्ष.

हा मेळावा राजूर-भोकरदन रोडवरील 'पुण्याई लॉन्स' येथे सकाळी १० वाजल्यापासून सुरू होणार आहे.

शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवण्याऐवजी, राजूर येथील या महामेळाव्यात सहभागी होऊन आपल्या प्रलंबित कामांचा निपटारा करून घ्यावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील नागरिकांसाठी ही एक सुवर्णसंधी असून, सर्व विभागांचे अधिकारी एकाच ठिकाणी उपस्थित राहणार असल्याने योजनांची माहिती मिळवणे अधिक सोपे होणार आहे.

## भोकरदन पोलिसांची मोठी कारवाई: मोटारसायकल चोरीचे रॅकेट उघड, आरोपी अटकेत




**आत्ताच एक्सप्रेस**

**भोकरदन (प्रतिनिधी)**भोकरदन पोलिसांनी मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्याचा तपास लावत एका आंतरजिल्हा रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी ७५,००० रुपये किमतीच्या दोन मोटारसायकली जप्त केल्या असून एका आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.

जैन मंदिर, बाजारपट्टी भोकरदन येथून एक मोटारसायकल चोरीला गेल्याप्रकरणी भोकरदन पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १७२/२०२५, कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास करत असताना पोलिसांना महत्त्वपूर्ण धागेदोरे मिळाले.

या गुन्ह्यातील चोरीची मोटारसायकल आरोपी गणेश बाबुराव पाटील (वय ४२ वर्षे, रा. कळमसरा, ता. पाचोरा, जि. जळगाव) याच्याकडे असल्याची माहिती मिळाली होती. जळगाव पोलिसांनी यापूर्वीच त्याला ताब्यात घेतले होते.

तपास अधिकारी पोलीस नाईक प्रशांत उबाळे यांनी जळगाव येथे जाऊन आरोपीचा ताबा घेतला. त्यानंतर दि. २३/०२/२०२६ रोजी त्याला रीतसर अटक करण्यात आली. आरोपीकडून अधिक चौकशी केली असता, चोरीचे एक मोठे रॅकेट समोर आले असून त्याच्याकडून दोन मोटारसायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत.

# अभ्यासू आक्रमकता विरुद्ध प्रशासकीय बचावात्मकता

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सुधीर मुनगंटीवारांचा 'रुद्रावतार' आणि योगेश कदमांची झालेली कोंडी ही केवळ वैयक्तिक चकमक नसून, ती विधीमंडळाच्या कामकाजातील गांभीर्यावर अधोरेखित केलेले बोट आहे.

महाराष्ट्र विधानसभेच्या परंपरेत लक्षवेधी सूचनेला अनन्यसाधारण महत्त्व असते. जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर सरकारला धारेवर धरण्याचे हे एक प्रभावी शस्त्र आहे. मात्र, जेव्हा सत्ताधारी पक्षाचेच एक अत्यंत ज्येष्ठ आणि अनुभवी नेते, सुधीर मुनगंटीवार, आपल्याच सरकारमधील राज्यमंत्र्यांना 'अभ्यास करून येण्याचा' सल्ला देतात, तेव्हा त्यामागील वेदना ही केवळ राजकीय नसून ती शेतकरी हिताची असल्याचे स्पष्ट होते.

धान उत्पादकांचा वनवास आणि सरकारी 'कुंभकर्ण' झोप

विदर्भातील आणि कोकणातील लाखो शेतकरी धान उत्पादनावर अवलंबून आहेत. मुनगंटीवारांनी उपस्थित केलेला मुद्दा अत्यंत रास्त होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २५ डिसेंबर रोजी आदेश देऊनही, दोन महिने उलटल्यानंतरही शासन निर्णय (GR) का निघाला नाही? हा प्रश्न प्रशासकीय मरगळ झटकणारा होता. मुनगंटीवारांनी वापरलेला कुंभकर्णाचा बाप हा शब्दप्रयोग अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या संथ कार्यपद्धतीवर ओढलेले कडक ओढारे आहेत. ७ लाख शेतकरी जेव्हा मदतीची प्रतीक्षा करत असतात, तेव्हा 'बैठक लावतो' किंवा 'फाइलीचा प्रवास सुरू आहे' अशी उत्तरं अपेक्षित नसतात.

राज्यमंत्री योगेश कदम यांनी गेल्या तीन वर्षांतील बोनसच्या वाढत्या आकड्यांचा पाढा वाचून सरकारची पाठ थोपटून घेण्याचा प्रयत्न केला. परंतु, मुनगंटीवारांनी तो मुद्दा खोडून काढताना मांडलेली भूमिका महत्त्वाची आहे. निधीचा आकडा वाढला कारण उत्पादन खर्च आणि महागाई वाढली, हे साधे गणित मंत्र्यांच्या लक्षात यायला हवे होते. केवळ आकड्यांचे फुगे हवेत सोडण्यापेक्षा, ज्या शेतकऱ्यांची पोर्टलवर नोंदणी आहे, त्यांना थेट लाभ का मिळत नाही? हा कळीचा मुद्दा मुनगंटीवारांनी लावून धरला.

सभागृहात प्रश्नांची उत्तरे देताना मंत्र्यांनी पूर्ण तयारीनिशी येणे हे संसदीय लोकशाहीचे मूलभूत तत्व आहे. मुनगंटीवारांनी जेव्हा अशाप्रकारे उत्तर देणे हा संविधानाचा अपमान आहे असे म्हटले, तेव्हा त्यांनी संसदीय कार्यप्रणालीच्या घसरत्या दर्जाकडे अंगुलीनिर्देश केला. 'बघतो, करतो, बैठक लावतो' या साचेबद्ध उत्तरांमुळे सभागृहाचा वेळ वाया जातो आणि प्रश्नांची तीव्रता कमी होते.

योगेश कदम हे युवा नेतृत्व असले तरी, विधीमंडळाच्या मैदानात मुनगंटीवारांसारख्या **'भीष्म पितामहा'**समोर टिकण्यासाठी केवळ सरकारी कागदपत्रे पुरेशी नसतात, तर प्रश्नांची जाण आणि प्रशासनावर वचक असणे आवश्यक असते. धान उत्पादकांच्या बोनसचा मुद्दा आता केवळ प्रशासकीय राहिला नसून तो प्रतिष्ठेचा बनला आहे. या 'सरबत्ती'नंतर तरी सरकार आता तातडीने जीआर काढून शेतकऱ्यांच्या खात्यात बोनस जमा करणार का, याकडे उभ्या महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

# जिद्द, वक्तृत्व आणि कर्तृत्व! नांदेडच्या 'कोंढा' गावातील सुपुत्र नवनाथ बन

## यांचा भाजपच्या मुख्य प्रवक्तेपदापर्यंतचा देदीप्यमान प्रवास




**आत्ताच एक्सप्रेस**
**मुंबई/ प्रतिनिधी**/ ग्रामीण भागातील गुणवत्ता आणि जिद्दीला जर योग्य दिशा मिळाली, तर यशाचे शिखर गाठता येते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे नवनाथ बन. मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्याच्या एका छोट्याशा गावातून सुरू झालेला हा प्रवास आज राज्याच्या राजकीय पटलावर **'भाजपचे मुख्य प्रवक्ते'** या पदापर्यंत येऊन पोहोचला आहे. आपल्या धारदार शब्दांनी आणि अभ्यासू वृत्तीने त्यांनी माध्यमविश्वात आणि आता राजकारणात स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

**ग्रामीण पाळेमुळे आणि शैक्षणिक जडणघडण**

नांदेड जिल्ह्यातील कोंढा हे नवनाथ बन यांचे मूळ गाव. त्यांचे प्राथमिक शिक्षण गावापासून काही अंतरावर असलेल्या महात्मा बसवेश्वर हायस्कूल (कामठा) येथे झाले. वडिलांच्या बदलीच्या नोकरीमुळे त्यांना पुढे बीडमध्ये स्थलांतर करावे लागले. या सततच्या भ्रमंतीने त्यांना महाराष्ट्रातील विविध स्तरांतील माणसे आणि संस्कृती जवळून पाहण्याची संधी दिली, जी पुढे त्यांच्या पत्रकारितेसाठी आणि राजकीय विश्लेषणासाठी पाया ठरली.

**वक्तृत्व आणि विद्यार्थी चळवळीचा वारसा**

नवनाथ बन यांच्यातील नेतृत्वाचे गुण महाविद्यालयीन जीवनातच बहरले. बीडच्या स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयात शिक्षण घेत असताना त्यांनी अनेक नामांकित वक्तृत्व स्पर्धा गाजवल्या.

ABVP मधील सक्रियता: २००४ ते २००८ दरम्यान त्यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे (ABVP) बीड शहरमंत्री म्हणून काम पाहिले. कॉपीमुक्त अभियान: शिक्षणातील अनिष्ट प्रथांविरुद्ध लढा देताना त्यांनी बीड जिल्हा **'कॉपीमुक्त'** करण्यासाठी मोठे अभियान राबवले. त्यांच्या याच नेतृत्वगुणामुळे त्यांची निवड 'विद्यार्थी संसद सचिव' म्हणून झाली.

पत्रकारितेतील १५ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव

साध्या आणि सरळ मार्गापेक्षा संघर्षाचा मार्ग निवडत त्यांनी पत्रकारितेत पाऊल ठेवले. २००८ मध्ये बीडमधून स्थानिक दैनिकांपासून सुरू झालेला हा प्रवास २०१० मध्ये 'एबीपी माझा' (तत्कालीन स्टार माझा) या अग्रगण्य वृत्तवाहिनीत येऊन पोहोचला. पुढील १५ वर्षे त्यांनी तिथे 'निर्माता' (Producer) म्हणून महत्त्वाची जबाबदारी सांभाळली.

**गाजलेले कार्यक्रम:**

**राजकीय विश्लेषण:** 'नमो व्हर्से स रागा', 'कोण होणार मुख्यमंत्री?' यांसारख्या कार्यक्रमांतून त्यांनी राज्याची



राजकीय नाडी ओळखली.

**लोकसंवाद:** 'नगरपालिकेच्या नाक्यावर' या कार्यक्रमाद्वारे त्यांनी सामान्य जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडली.

**सांस्कृतिक ठेवा:** पंढरपूरच्या वारीचे कव्हरेज आणि 'माझा कट्टा' या कार्यक्रमात दिग्गज मान्यवरांशी केलेला संवाद यामुळे त्यांची ओळख महाराष्ट्रभर झाली.

**राजकीय क्षेत्रातील नवी इनिंग**

पत्रकारितेतील दांडगा अनुभव आणि विषयांची खोल जाण पाहून भारतीय जनता पार्टीने त्यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवली.

२०२३: भाजप महाराष्ट्र माध्यम विभाग प्रमुख म्हणून नियुक्ती.

सध्या: भारतीय जनता पार्टीचे 'मुख्य प्रवक्ते' म्हणून पदभार.

माध्यम प्रमुखाच्या भूमिकेत त्यांनी पक्षाची बाजू सोशल मीडिया आणि मुख्य प्रवाहातील माध्यमांत अत्यंत प्रभावीपणे मांडली. आता मुख्य प्रवक्ते म्हणून ते पक्षाची ध्येयधोरणे आणि विरोधकांच्या आरोपांना मुद्देसूद उत्तर देण्याचे काम चोखपणे पार पाडत आहेत.

युवकांसाठी प्रेरणास्थान

कोंढा ते मुंबई हा प्रवास सोपा नव्हता. कोणतीही राजकीय किंवा कौटुंबिक पार्श्वभूमी नसताना केवळ वक्तृत्व, अभ्यास आणि निष्ठेच्या जोरावर त्यांनी हे स्थान मिळवले आहे. आजचा तरुण, जो मोठ्या शहरात आपली ओळख निर्माण करू इच्छितो, त्याच्यासाठी नवनाथ बन यांचा प्रवास एक आदर्श वस्तुपाठ आहे.शब्दांचे सामर्थ्य आणि जनसामान्यांशी असलेली नाळ हीच नवनाथ बन यांची खरी ताकद आहे.

# पतीला अपंग करणाऱ्या पत्नीला पोटगी नाकारली; अलाहाबाद उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल

आत्ताच एक्सप्रेस
जालना/प्रतिनिधी/ स्वतःच्या कृत्याने पतीला अपंग बनवून, त्याची कमावण्याची क्षमता हिरावून घेणारी पत्नी पतीकडून पोटगी मिळवण्यास पात्र नाही, असा महत्त्वपूर्ण आणि क्रांतीकारी निकाल अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिला आहे. 'विनीता विरुद्ध डॉ. वेद प्रकाश सिंह' या खटल्यात न्यायालयाने हा निकाल दिला असून, यामुळे कौटुंबिक कायद्याचा गैरवापर करणाऱ्यांना मोठा चपराक बसली आहे.

या निकालावर प्रतिक्रिया देताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश एस. धनावत यांनी म्हटले की, हा निकाल म्हणजे कायद्याच्या गैरवापराला आळा घालणारा आणि पीडित पुरुषांना मोठा दिलासा देणारा 'मैलचा दगड' ठरेल.

प्रकरण काय होते?

या प्रकरणातील पती डॉ. वेद प्रकाश सिंह यांच्यावर त्यांच्या पत्नीच्या नातेवाईकांनी जीवघेणा हल्ला केला होता. पत्नीचा भाऊ आणि वडिलांनी क्लिनिकमध्ये घुसून डॉ. सिंह यांच्यावर गोळीबार केला. त्यातील एक गोळी त्यांच्या पाठीच्या कण्यात अडकली, ज्यामुळे ते कायमचे अपंग झाले आणि त्यांची वैद्यकीय सराव करण्याची (कमावण्याची) क्षमता पूर्णपणे नष्ट झाली.

एकीकडे पतीला शारीरिक दृष्ट्या हतबल केल्यानंतर, पत्नी विनीता हिने पतीकडे फौजदारी प्रक्रिया संहिता (CrPC) कलम १२५ नुसार पोटगीसाठी मागणी केली होती.

**न्यायालयाने नोंदवलेली महत्त्वाची निरीक्षणे**

अलाहाबाद उच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत पत्नीची याचिका फेटाळून लावली. न्यायालयाने खालील मुद्दे स्पष्ट केले:

कमावण्याची क्षमता: पतीची पत्नीचे पालनपोषण करण्याची जबाबदारी ही त्याच्या 'कमावण्याच्या क्षमतेवर' अवलंबून असते. जर ही क्षमता पत्नीच्याच कुटुंबीयांनी हिरावून घेतली असेल, तर पतीवर हा बोजा टाकता येणार नाही.

स्वतःच्या चुकीचा फायदा नाही: कोणताही पक्ष स्वतःच्या चुकीचा किंवा गुन्हेगारी कृत्याचा फायदा घेऊन कायदेशीर लाभ



मिळवू शकत नाही.

न्यायाचे तत्त्व: कायद्याची कलमे ही केवळ शब्द नसून ती सामाजिक न्यायासाठी आहेत. अन्याय करणाऱ्यालाच कायद्याचे संरक्षण मिळणे हे अनैतिक आहे.

तज्ज्ञांचे मत: महाराष्ट्रातील पुरुषांसाठी दिलासा

ड. महेश एस. धनावत यांच्या मते, जालना आणि संपूर्ण महाराष्ट्रात अनेकदा पुरुषांवर खोटे आरोप करून पोटगी उकळण्याचे प्रकार घडतात. या निकालामुळे अशा प्रकरणांमध्ये अडकलेल्या पुरुषांना आता भक्कम कायदेशीर आधार मिळाला आहे.

हा निकाल लैंगिक समानतेच्या दिशेने पडलेले मोठे पाऊल आहे. कायदा महिलांच्या संरक्षणासाठी नक्कीच आहे, पण तो पुरुषांवर अन्याय करण्याचे साधन बनता कामा नये, असे ड. धनावत यांनी नमूद केले.

आता नवीन कायद्यानुसार (भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३), जुन्या उीझउ १२५ च्या जागी कलम १४४ लागू झाले आहे. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने 'शमीमा फारुकी विरुद्ध शाहीद खान' प्रकरणात दिलेला निकाल आणि आताचा हा निकाल, हे दोन्ही पतीच्या प्रत्यक्ष उत्पन्नावर आणि परिस्थितीवर आधारित न्यायाची भूमिका स्पष्ट करतात.

हा निकाल समाजातील एका कटू वास्तवाकडे लक्ष वेधतो की, कौटुंबिक हिंसाचाराचा बळी केवळ महिलाच नाही तर पुरुषही असू शकतात. पतीला आयुष्यभरासाठी अपंग करून पुन्हा त्याच्याकडूनच पैशांची अपेक्षा करणे हे 'कायद्याच्या मूळ हेतूच्या' विरोधात आहे, हेच या निकालाने अधोरेखित केले आहे.

# जालन्यात घुमणार पारंपरिक कलेचा जागर

## २५ फेब्रुवारीपासून 'प्रधानमंत्री विश्वकर्मा' प्रदर्शन व विक्री मेळावा

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना/प्रतिनिधी/** जालन्यातील पारंपरिक कारागीर आणि शिल्पकारांच्या हाताला हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार सरसावले आहे. भारत सरकारच्या 'एमएसएमई' मंत्रालय आणि महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जालन्यात तीन दिवसीय 'प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना प्रदर्शन व विक्री' कार्यक्रमाचे जंगी आयोजन करण्यात आले आहे.

हे प्रदर्शन २५ ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत जुना जालना भागातील मस्तगढ येथील शितल गार्डन येथे भरवण्यात येणार आहे.

स्थानिक कारागिरांच्या कौशल्याला दाद देण्यासाठी जालनावासियांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन एमएसएमई विकास कार्यालयाचे सहायक संचालक राहुलकुमार मिश्रा यांनी केले आहे.

प्रदर्शनाचा उद्घाटन सोहळा बुधवार, दि. २५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५:०० वाजता पार पडणार आहे.

जालन्याच्या महापौर वंदना मगरे यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्घाटन होईल. याप्रसंगी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. आणि सहायक संचालक राहुलकुमार मिश्रा यांची प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शन लाभणार आहे.

१८ प्रकारचे कारागीर: सुतार, लोहार, सुवर्णकार, कुंभार, मूर्तिकार, मोची, चटई-झाडू आणि खेळणी निर्माते अशा १८ विविध क्षेत्रांतील कारागिरांचे स्टॉल्स.५० हून अधिक स्टॉल्स: विविध वैविध्यपूर्ण स्वदेशी उत्पादनांचे आकर्षण.नि:शुल्क संधी: कारागिरांना आपली कला सादर करण्यासाठी आणि वस्तू विक्रीसाठी कोणतेही शुल्क आकारले गेलेले नाही.

तांत्रिक मार्गदर्शन: केवळ विक्रीच नव्हे, तर उद्योजकांना ब्रँड नोंदणी आणि बौद्धिक संपदा (Intellectual Property) या विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळणार आहे.

केवळ व्यापारच नव्हे, तर नागरिकांच्या मनोरंजनासाठी आणि तरुणांच्या रोजगारासाठी विशेष कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे:

२६ फेब्रुवारी: स्वयंरोजगार कार्यशाळेचे आयोजन.सांस्कृतिक कार्यक्रम: २६ तारखेच्या सायंकाळी 'संगीत संध्या' या विशेष कार्यक्रमाचा आनंद घेता येईल.

नागरिकांसाठी महत्त्वाची माहिती:ठिकाण: शितल गार्डन, मस्तगढ, जुना जालना.

वेळ: सकाळी ११:०० ते सायंकाळी ७:०० वाजेपर्यंत.या उपक्रमाला लघु उद्योग भारती, डिक्की (DICCI), भीम उद्योग अभियान आणि अखिल भारतीय व्यापारी परिसंघ (जालना) यांसह विविध व्यापारी संघटनांनी सक्रिय पाठिंबा दर्शविला आहे. पत्रकार परिषदेला जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक मंगेश केदार, खादी ग्रामोद्योग अधिकारी बी. के. वाघमारे व कौशल्य विकास विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# जामडी येथे जिल्हा परिषद पंचायत समिती सदस्य झालेले यांचा भव्य सत्कार

कन्नड /प्रतिनिधी/कन्नड तालुक्यातील जामडी जहांगीर येथे ग्रामपंचायत व ग्रामस्थ यांच्या वतीने आयोजित कार्यक्रम प्रसंगी जिल्हा परिषद सदस्य रावसाहेब पवार व पंचायत समिती सदस्य सविता जगन जंगले व अनुराधा जयस्वाल यांचा भव्य सत्कार सन्मान करण्यात आला. प्रसंगी गावातील विविध मान्यवरांचा देखील सत्कार सन्मान करण्यात आला. याप्रसंगी पदाधिकाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. गावातील स्मशानभूमीचा व रस्त्याचा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी सरपंच दिनकर खरात व ग्रामस्थांनी केला. यावेळी आपल्या गावातील रस्ता व स्मशानभूमीचा काम पूर्ण करू असे आश्वासन रावसाहेब पवार यांनी दिले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे खासदार संदीपान भुमरे व पालकमंत्री संजय शिरसाट, आमदार संजना जाधव यांचे विशेष आभार व्यक्त केले. प्रसंगी जनतेने आमच्यावर विश्वास दाखवला होते.

# माणसाच्या विचारांचा गंध

बाबा, किती वेळा सांगितलं तुम्हाला? डायपर घालता येत नसेल तर अंथरुणात पडू नका. संपूर्ण घरभर वास सुटला. आज माझे क्लायंट्स घरी येणार आहेत. तुमची ही 'घाण' मला आता सहन होत नाही. सुमितने रागाने आपल्या ७० वर्षांच्या वडिलांच्या, आप्पांच्या अंगावर चादर फेकत आरडाओरडा केला. एके दिवशी सकाळी सुमितच्या घरी एक महत्त्वाची मीटिंग होती. त्याच वेळी आप्पांची (वडिलांची) तब्येत बिघडली आणि त्यांची अंथरुणातच लघवी झाली. यामुळे पूर्ण खोलीत वास सुटला. सुमितला उशीर होत होता आणि त्या वासाने त्याला मळमळायला लागले. तेव्हा त्याचा तोल सुटला आणि तो वडिलांचा अपमान करायला लागला.

आप्पा थरथरत्या हाताने कोप-यात मान खाली घालून बसले होते. त्यांच्या डोळ्यातून पाणी वाहत होतं. इतक्यात स्वयंपाकघरातून सुमितची बायको जानकी बाहेर आली. तिच्या हातात गरम पाण्याचे भांडे होते. तिने ते जोरात टेबलवर आपटले. तिने सुमितकडे बघत शांत पण कणखर आवाजात म्हटलं, सुमित, आवाज खाली! ज्या हातांनी आजवर तुझी 'घाण' साफ करून तुला मोठं केलं, त्याच हातांना आज तुला सांभाळता येत नाही? वास त्यांच्या आजाराचा नाही, तुझ्या सडलेल्या विचारांचा येतो आणि ऐक... क्लायंट्स महत्त्वाचे असतील तर त्यांना हॉटेलमध्ये घेऊन जा. हे घर 'आप्पांचं' आहे आणि जोवर मी जिवंत आहे, तोवर या घरातला 'राजा' तेच राहतील.

कोकणातल्या एका गावातलं एक कौलारू घर. तिथे 'आप्पा' म्हणजे शंकरराव सर राहत होते. आयुष्यभर शाळेत शिकवून हजारो मुलं घडवली. स्वतःचा मुलगा सुमित हुशार होता म्हणून त्यांनी आपल्या जमिनीचा तुकडा आणि आंब्याची बाग विकून त्याला पुण्यात इंजिनिअरिंगला शिकवलं. सुमितने पुण्यात नोकरी मिळवली, फ्लॅट घेतला आणि जानकीशी लग्न केलं. जानकी अनाथ होती, तिला आई-वडील नव्हते. लग्नानंतर जेव्हा ती पहिल्यांदा आप्पांच्या पाया पडली, तेव्हा आप्पांनी तिच्या डोक्यावर हात ठेवून सांगितलं होतं, पोरी, सून न्हाय लेक म्हणून रहा. आप्पांना पार्किन्सन झाला होता. त्यामुळे त्यांचे हात थरथरायचे. एकटे राहणं कठीण झालं म्हणून सुमितने त्यांना पुण्यात आणलं. पण पुण्यातला सुमित आता कोकणातला सुमित राहिला नव्हता. हाय-प्रोफाईल सोसायटी, पार्ट्या आणि स्टेटसच्या नादात त्याला बापाची अडचण वाटू लागली. जानकी मात्र आप्पांची आई झाली होती. ती त्यांना वेळेवर औषधं देण्यापासून ते त्यांचे कपडे बदलण्यापर्यंत सगळं करायची.

एकदा रात्री जेवताना आप्पांचा हात थरथरला आणि डाळीची वाटी सांडली. डाळ सुमितच्या ब्रँडेड पँटवर पडली. सुमित ताडकन उठला. शिट! बाबा, तुम्हाला नीट खाता येत नाही का? प्राण्यासारखं खाता तुम्ही. उद्यापासून तुम्ही किचनमध्ये खाली बसून जेवत जा. डायनिंग टेबलवर नको. आप्पांच्या डोळ्यात पाणी आलं. त्यांनी अर्धच जेवण सोडलं. जानकीने त्या रात्री सुमितशी भांडण केलं नाही, पण तिनेही जेवण सोडलं. ती आप्पांच्या खोलीत गेली. त्यांना हाताने भरवलं आणि म्हणाली, आप्पा, तुम्ही नका मनावर घेऊ. त्याला कामाचा ताण आहे. पण आप्पांना कळत होतं की आपला मुलगा आपल्याला कंटाळला. डॉक्टरांनी आप्पांसाठी एक नवीन इंजेक्शन लिहून दिलं होतं, जे थोडं महाग होतं. जानकी सुमितला म्हणाली, सुमित, बाबांची औषधं संपली आहेत. त्यासाठी ८००० रुपये हवेत.

सुमित चिडला आणि म्हणाला, जानकी, तू समजून का घेत नाहीस? पुढच्या महिन्यात मला नवीन कार घ्यायची आहे. या म्हाता-याच्या औषधांवर दर महिन्याला इतका खर्च आणि काय फरक पडणार आहे? त्यांचं वय झालंय आता. जानकीला धक्का बसला. स्वतःच्या बापाच्या जीवापेक्षा मुलाला कार महत्त्वाची वाटत होती. त्या दिवशी जानकीने स्वतःचे सोन्याचे कानातले मोडले आणि आप्पांची औषधं आणली. सुमितला हे समजलं नाही. सुमितची मुलगी पिहूचा वाढदिवस होता. मोठी पार्टी होती. सुमितने आप्पांना धमकी दिली, खबरदार जर खोलीच्या बाहेर आलात तर. माझे मित्र येणार आहेत, मला तुमची लाज वाटते. त्याने बाहेरून आप्पांच्या खोलीला कडी लावली. आत पंखा बंद होता आणि खूप उकडत होतं.

पार्टी संपल्यावर जानकी जेव्हा कडी उघडून आत गेली, तेव्हा आप्पा घामाने भिजून बेशुद्ध पडले होते. त्यांना श्वास घ्यायला त्रास होत होता. जानकीने आरडाओरडा केला, डॉक्टरांना बोलावलं. सुमित मात्र निर्विकार होता. काय नाटकं आहेत यांची. असं तो पुटपुटला. या प्रसगानंतर दोन दिवसांनी सुमित घरी लवकर आला. तो खूप गोड बोलत होता. बाबा, तुम्हाला इथे कोंडल्यासारखं वाटत असेल ना? माझ्या एका मित्राने लोणावळ्याला एक 'नेचर केअर सेंटर' काढलं. तिथे खूप झाडं आहेत, तुमच्या वयाची माणसं आहेत. तुम्ही तिथे राहायला जा. खूप मज्जा येईल.आप्पांना वाटलं मुलाला आपली काळजी वाटते. तितक्यात सुमितने एक फॉर्म काढला, फक्त इथे अंगठा द्या.आप्पा अंगठा देणार इतक्यात जानकीने तो कागद हिसकावून घेतला. तिने वाचलं. तो 'आनंदाश्रम' नावाचा एक स्वस्त वृद्धाश्रम होता, जिथे एकदा माणसाला सोडलं की घरचे लोक जबाबदारीतून मुक्त होतात. त्या फॉर्मवर लिहिले होते, पालकांचा ताबा सोडत आहोत. जानकीने तो कागद फाडून सुमितच्या तोंडावर फेकला. सुमित, इतका खाली घसरलास तू? ज्या बापाने पोटाला चिमटा घेऊन तुला इंजिनिअर केलं, त्यांना तू भंगारातल्या वस्तूंसारखा घराबाहेर काढतोस? सुमित ओरडला, हो! काढणार! मला माझं आयुष्य जगायचं आहे. हे म्हातारं ओझं मला नको आता आणि जानकी तू मध्ये बोलू नकोस. तू माझी बायको आहेस, या घराची मालकीण नाही. तुला जर यांची इतकीच सेवा करायची असेल, तर तू पण चालती हो. सुमितला वाटलं जानकी घाबरेल.

पण जानकीने कपाटातून आपली बॅग काढली. तिने आप्पांचा हात पकडला. आप्पा रडत होते, नको पोरी, माझ्यापायी तुझा संसार मोडू नकोस. मी जातो आश्रमात. जानकीने आप्पांचे अश्रू पुसले आणि सुमितकडे बघून म्हणाली, सुमित, संसार दोघांचा असतो रे, पण तिथे माणुसकी असावी लागते. जिथे माझ्या बापाचा सन्मान नाही, तिथे मला राहायचंच नाही. मी अनाथ होते, पण या माणसाने मला मुलगी मानलं. आज रक्ताचा मुलगा वैरी झाला, पण ही परकी मुलगी शेवटच्या श्वासापर्यंत बापाची काठी होईल. मी घटस्फोटाची नोटीस पाठवते, सह्या करायला तयार रहा. जानकी आणि आप्पा त्या रात्रीच घर सोडून निघाले. बाहेर पाऊस पडत होता. त्यांच्याकडे जायला जागा नव्हती. त्यांनी ती रात्र एसटी स्टँडच्या बाकावर काढली.

दुस-या दिवशी जानकीने आपल्या जुन्या मैत्रिणीच्या मदतीने एक छोटी खोली भाड्याने घेतली. जानकीने पुन्हा ट्युशन्स घ्यायला सुरुवात केली. तिने दिवसरात्र कष्ट केले. आणितीन वर्षांनंतर... एका मोठ्या हॉलमध्ये 'आदर्श शिक्षिका आणि समाजसेविका' म्हणून जानकीचा सत्कार चालू होता. स्टेजवर जानकी माईकवर बोलत होती आणि खाली प्रेक्षकांमध्ये आप्पा आता ठणठणीत बरे होऊन अभिमानाने टाळ्या वाजवत होते. जानकी म्हणाली, लोक म्हणतात सासू-सासरे त्रास देतात, पण कधीकधी आपणच त्यांना समजून घेण्यात कमी पडतो. मी आज जी काही आहे, ती माझ्या या बाबांमुळे आहे. कार्यक्रमाच्या शेवटी एक फाटका माणूस तिथे आला. तो सुमित होता. गेल्या तीन वर्षात शेअर मार्केटमध्ये नुकसान होऊन आणि एकटेपणामुळे तो खचला होता. त्याला वाटलं जानकी आणि आप्पा त्याला माफ करतील.

तो आप्पांच्या पाया पडायला गेला. जानकीने त्याला अडवलं. सुमित सर, इथे फक्त 'निमंत्रित' लोकांना प्रवेश आहे. ज्यांनी नाती तोडली, त्यांना परत जोडायला फेविकॉल मिळत नाही. तुम्ही जाऊ शकता. सुमित रिकाम्या हाताने परत फिरला. त्याला जाणवलं की त्याने हिरा (बायको) आणि देव (बाप) दोन्ही गमावले होते. आप्पांनी जानकीकडे पाहिलं. पोरी, तू खूप कठोर झालीस. जानकीने आप्पांचा हात आपल्या हातात घेतला आणि डोळ्यात पाणी आणून म्हणाली, आप्पा, ज्या झाडाने मला उन्हात सावली दिली, ते झाड म्हातारं झालं म्हणून त्याला तोडून कसं टाकू? तुम्ही माझं ओझं नाही, तर माझ्या घराचं 'मूळ' आहात! आणि ज्यांना हे ओझं वाटलं, त्यांचा भार आपण स्वतःहून कमी केला.

**- शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली,यवतमाळ**

# पाच वर्षीय चिमुकल्याचा पहिला रोजा; गंगापूरच्या उस्मान खानने वयाच्या पाचव्या वर्षी दाखवली जिद्द

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर (प्रतिनिधी)** इस्लाम धर्मातील अत्यंत पवित्र आणि आध्यात्मिक महिना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रमजान महिन्यात उपवास, नमाज, संयम आणि दानधर्माला विशेष महत्त्व आहे. याच पवित्र महिन्याचे औचित्य साधून गंगापूर येथील काजिपुरा भागातील रहिवासी असलेल्या अवघ्या पाच वर्षांच्या उस्मान आवेश खान या चिमुकल्याने आपल्या जीवनातील पहिला रोजा अत्यंत उत्साहाने आणि जिद्दीने पूर्ण केला आहे.रमजान महिन्यातील उपवास (रोजा) हा पहाटेच्या 'सहरी' पासून ते सायंकाळच्या 'इफ्तार' पर्यंत अन्नाचा कणही न घेता आणि पाण्याचा थेंबही न पिता पाळला जातो. कडक उन्हात आणि तहानेवर मात करत दिवसभर उपवास करणे मोठ्यांसाठीही आव्हानात्मक असते, मात्र उस्मानने वयाच्या पाचव्या वर्षी ही किमया करून दाखवली. केवळ उपवासच नव्हे, तर त्याने दिवसभरात पाचवेळची नमाज अदा करून आत्मशुद्धीच्या मार्गावर आपले पहिले पाऊल टाकले आहे. त्याच्या या संयमामुळे संपूर्ण परिसरात त्याचे कौतुक होत आहे.सायंकाळी इफ्तारची वेळ झाली तेव्हा उस्मानच्या चेहऱ्यावर एक वेगळेच समाधान पाहायला मिळाले. या खास प्रसंगी कुटुंबातील सदस्य, नातेवाईक आणि परिसरातील नागरिकांनी एकत्र येत उस्मानचा सत्कार केला. त्याला भेटवस्तू देऊन त्याचे अभिनंदन करण्यात आले.यावेळी प्रतिक्रिया देताना उस्मानच्या कुटुंबीयांनी सांगितले की, रमजान हा सब्र (संयम) आणि शुक्र (कृतज्ञता) शिकवणारा महिना आहे. आपल्या मुलांवर लहानपणापासूनच धार्मिक आणि नैतिक संस्कार व्हावेत, हीच आमची इच्छा आहे. उस्मानने दाखवलेली ही जिद्द आम्हा सर्वांसाठी अभिमानास्पद आहे. उस्मानच्या या पहिल्या रोजामुळे खान कुटुंबासह संपूर्ण काजिपुरा परिसरात सध्या आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण पसरले आहे.



# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

**(महिला व बाल विकास विभाग)**

फोन:-०२४०२३३५३६-४० contact@chhsambhajinagarmc.org

जा.क्र./मनपा/म.बा.क स/ २/ /२०२६ दिनांक : २३/०२/२०२६

## जाहीर प्रगटन

**महिला व बाल विकास विभाग**
**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**

या जाहीर प्रगटनाव्दारे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील सर्व महिला व मुली यांना सुचित करण्यात येते कि, नगर विकास विभाग शासन निर्णय दिनांक २९ मार्च २०२२ मध्ये महिलां व मुली करीता विविध प्रकारचे योजना राबविणे करीता नमुद असल्याप्रमाणे महानगरपालिका महिला व बालविकास विभागामार्फत महानरपालिका हद्दीतील रहिवासी असलेल्या मुली व महिला यांच्या साठी विविध प्रकारचे व्यावसायिक प्रशिक्षणे आयोजित करण्यात येत आहे.

एका प्रशिक्षणाकरिता प्रत्येक वार्डमधुन चार प्रशिक्षणार्थी निवडण्यात येतील. प्रशिक्षणाकरिता खालील कागदपत्रे अर्जासोबत विभागात दाखल करणे आवश्यक आहे.

१. मनपा हद्दीतील तहसिल कार्यालयाचे रहिवासी प्रमाणपत्र.
२. तहसिल कार्यालयाचे उत्पन्नाचा दाखला.
३. प्रशिक्षणाकरिता खालील तक्त्यात नमुद प्रमाणे शैक्षणिक अर्हता धारण केले बाबतचा पुरवा (टि.सी./ बोनाफाईड प्रमाणपत्र इ.).
४. वयोमर्यादा १८ ते ५० वर्ष.
५. जातीचा दाखला.
६. आधारकार्ड / मतदान कार्ड.
७. प्रशिक्षणार्थी यांनी तीन प्रशिक्षणाचे पर्याय नमुद करावेत, त्यातील एका प्रशिक्षणासाठी त्यांची निवड करण्यात येईल.
८. प्रशिक्षणाकरिता निवड झालेल्या उमेदवार यांनी प्रशिक्षण शुल्काची १०% रक्कम मनपा लेखा विभागात भरणा केल्यानंतर भरणा केलेली पावती विभागात सादर केल्यानंतर प्रशिक्षणार्थीना प्रवेश देण्यात येईल.
९. सर्वप्रथम येणाऱ्या लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येईल.

इच्छुकांनी महिला व बाल विकास विभागात रू. ५ शुल्कचे भरणा करून अर्ज प्राप् करून घ्यावा.

| अ.क्र. | प्रशिक्षणाचे नांव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | ॲडव्हान्स फॅशन टेलरिंग कोर्स | ८ वी पास |
| २ | ॲडव्हान्स फॅशन डिझायनिंग कोर्स | ८ वी पास |
| ३ | एम्ब्रॉयडरी | ८ वी पास |
| ४ | टेलरिंग-गारमेंट मेकिंग, चुडीदार गाऊन मेंकिग | ८ वी पास |
| ५ | बेकरी कन्फेक्शनरी | ८ वी पास |
| ६ | ॲडव्हान्स बेकरी कोर्स | ८ वी पास |
| ७ | बेकरी प्रोडक्टस | ८ वी पास |
| ८ | केक मेंकिग | ८ वी पास |
| ९ | मसाला व फुड प्रोसेसिंग | ८ वी पास |
| १० | चॉकलेट मेंकिग | ८ वी पास |
| ११ | जॅम व जेली प्रोडक्टस | ८ वी पास |
| १२ | दुध प्रोडक्टस | ८ वी पास |
| १३ | तेल घानी | ८ वी पास |
| १४ | ॲडव्हान्स मेंहदी डिझाइन | ८ वी पास |
| १५ | बेसिक ब्युटी पार्लर | ८ वी पास |
| १६ | बेसिक ब्युटीशियन कोर्स व मेंहदी डिझाइन | ८ वी पास |
| १७ | बेसिक / ॲडव्हान्स ब्युटीशियन | ८ वी पास |
| १८ | हेयर स्टाइल | ८ वी पास |
| १९ | अगरबत्ती व डिटर्जट कोर्स | ८ वी पास |
| २० | बेसिक / ॲडव्हान्स परफ्युम मेंकिग | ८ वी पास |
| २१ | कॉम्प्युटर बेसिक कोर्स /डाटा एन्ट्री ऑप्रेटर | ८ वी पास |
| २२ | बेसिक कॉम्प्युटर कोर्स विथ टॅली | ८ वी पास |
| २३ | कॉम्प्युटर हार्डवेअर ट्रेनिंग | ८ वी पास |
| २४ | डेस्कटॉप पब्लिशिंग | ८ वी पास |
| २५ | डेस्क्टॉप ॲण्ड लॅपटॉप रिपेअरिंग व सर्व्हिसिंग | ८ वी पास |
| २६ | मेणवती मेंकिग | ८ वी पास |
| २७ | फलॉवर बुके मॅकिंग | ८ वी पास |
| २८ | गोल्ड अप्रायझर | ८ वी पास |
| २९ | जीएसटी प्रॅक्टिशनर | ८ वी पास |
| ३० | हर्वल प्रोडक्टस मेंकिग | ८ वी पास |
| ३१ | डिटर्जंट / सोप/फिनाईल मेंकिग | ८ वी पास |
| ३२ | लिक्विड डिटर्जट / लिक्विड सोप मेंकिग | ८ वी पास |
| ३३ | सॉफ्ट टॉय मेंकिग | ८ वी पास |
| ३४ | मोबाईल रिपेअरिंग | ८ वी पास |
| ३५ | डिजीटल मार्केटिंग | ८ वी पास |

तरी पात्र इच्छुक उमेदवारांनी परिपूर्ण अर्ज दि. २४/०२/२०२६ ते दि. ११/०३/२०२६ (दस्तावेजात ११/०३/२०२६ नमूद असले तरी संदर्भावरून तो मार्च महिना असावा) या दरम्यान कार्यालयीन वेळेत महिला व बाल विकास विभाग मनपा मुख्य कार्यालय येथे सादर करावा. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**स्वाक्षरीत/-**
**अतिरिक्त आयुक्त २**
**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**

**महाराष्ट्र शासन**

## कार्यकारी अभियंता, मुख्य व्दार उभारणी पथक क्र. ४, छत्रपती संभाजीनगर

**पत्ता- कार्यकारी अभियंता, मुख्य व्दार उभारणी पथक क्र. ४, छत्रपती संभाजीनगर.**
ई-मेल पत्ता : eeunit4gmail.com दुरध्वनी क्र. ०२४०-२३३४६०२.
ई निविदा सुचना क्र. ९० सन २०२५ - २६

छत्रपती महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, मुख्य व्दार उभारणी पथक क्र. ४, संभाजीनगर,जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदारांकडुन खालील कामाकरीता ई निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://www.mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याच्या अधिकार कार्यकारी अभियंता, मुख्य व्दार उभारणी पथक क्र. ४ छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाचा जिल्हा | निविदेची अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|---|
| १ | शिवणा टाकळी ता कन्नड प्रकल्पावरील उजव्या छत्रपती संभाजीनगर व डाव्या कालव्यावरील सेवाव्दारे व आपत्काळीन व्दारेची देखभाल व दुरुस्ती कामे करणे. | छत्रपती संभाजीनगर | रु. २६,४८,३९६/- |

निविदा उपलब्ध कालावधी- दिनांक २४/०२/२०२६ ते दिनांक- ०३/०३/२०२६

निविदा उघडण्याचा दिनांक- ०४/०३/२०२६

जा.क्र. मुव्दाउप- ४ / तां - १ / ईनि.सु. क्र. ९० सन २०२५-२६/

**सही/-**
**ज. बा. पाटील**
**कार्यकारी अभियंता**
**मुख्यव्दार उभारणी पथक क्र. ४ छत्रपती संभाजीनगर**

जिमाका/छ.स.न.जाहि/ ६१५ /२०२५ २०२६

# बिडकीन येथे शताब्दी वर्षानिमित्त भव्य 'हिंदू संमेलन'; २८ फेब्रुवारीला ऐतिहासिक सोहळा

**आत्ताच एक्सप्रेस**

**बिडकीन/ विशेष प्रतिनिधी/** हिंदू धर्म, संस्कृती आणि मानवी मूल्यांच्या जपणुकीचा संदेश देण्यासाठी, तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाचे औचित्य साधून बिडकीन येथे भव्य 'हिंदू संमेलनाचे' आयोजन करण्यात आले आहे. या ऐतिहासिक सोहळ्याच्या पूर्वतयारीसाठी आज, २४ फेब्रुवारी रोजी स्वराज्य नागरी सहकारी पतसंस्था येथे विशेष पत्रकार परिषद पार पडली. या संमेलनामुळे संपूर्ण बिडकीन परिसरात सध्या उत्साहाचे आणि भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.

**शताब्दीपूर्ती आणि 'पंच परिवर्तन' संकल्पना**

१९२५ मध्ये विजयादशमीला डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी नागपूर येथे संघाची स्थापना केली. गेल्या १०० वर्षांत राष्ट्रभक्ती आणि सामाजिक समरसतेचा विचार घेऊन कार्य करणाऱ्या या संघटनेने आता शताब्दी वर्षात पदार्पण केले आहे. २०२५-२६ हे वर्ष साजरे करताना 'पंच परिवर्तन' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवण्यात आली आहे. यामध्ये:

सामाजिक सलोखा ,कौटुंबिक जाणीव, नागरिक कर्तव्य पालन, पर्यावरण जागरूकता, स्वावलंबन या पाच सूत्रांद्वारे राष्ट्र उभारणीचा संकल्प करण्यात आला आहे.

**कार्यक्रमाची रूपरेषा: २६ आणि २८ फेब्रुवारी**

संमेलनाचे नियोजन दोन टप्प्यांत करण्यात आले आहे.

१. पूर्वतयारी कार्यक्रम (गुरुवार, २६ फेब्रुवारी २०२६):

सकाळी ८:०० वाजता: महिलांची भव्य शोभायात्रा आणि युवकांची बाईक रॅली काढून वातावरणाची निर्मिती केली जाईल.

सकाळी १०:०० वाजता: सरस्वती भुवन विद्यालय मैदानावर ध्वजारोहण आणि भूमिपूजन समारंभ संपन्न होईल.

२. मुख्य हिंदू संमेलन (शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६) **वेळ:** सायंकाळी ६:०० वाजता.

**स्थळ:**श्री सरस्वती भुवन महाविद्यालय मैदान, बिडकीन विशेष आकर्षण: संमेलनानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

दिग्गज मान्यवरांची मांदियाळी

या संमेलनाला अध्यात्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थित राहणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने:

इंद्रेश कुमार (अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य, रा.स्व. संघ),ह.भ.प. महंत रामगिरीजी महाराज,ह.भ.प. कृष्णगिरीजी महाराज,मुनीश्री सुदर्शन नागराजबाबा कपाटे,ह.भ.प. कृष्णाजी महाराज नवले,धर्माचार्य साध्वी ह.भ.प. दुर्गा दिदी,पत्रकार परिषदेत आयोजकांचे आवाहन,आज झालेल्या पत्रकार परिषदेत हिंदू संमेलनाचे अध्यक्ष विजय शेजुळ, लहु अण्णा कांतबने, बबन आप्पा काळे आणि ह.भ.प. कृष्णा महाराज बोबडे यांची प्रमुख उपस्थिती होती.



संघाच्या शताब्दी निमित्त होणारा हा सोहळा हिंदू समाजाच्या एकतेचे दर्शन घडवणारा ठरेल. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी सर्व हिंदू बांधव-भगिनींनी सहकुटुंब उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष विजय शेजुळ यांनी केले.

या पत्रकार परिषदेचे सूत्रसंचालन रविंद्र गायकवाड यांनी केले, तर आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर औटी यांनी मानले. हिंदू संमेलन समिती, बिडकीन मंडलच्या वतीने या कार्यक्रमाला व्यापक प्रसिद्धी देण्याचे आवाहन सर्व प्रसारमाध्यमांना करण्यात आले आहे.

# जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंती उत्साहात साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव (प्रतिनिधी)** राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. 'स्वच्छता हीच सेवा' हा संदेश देत शाळेच्या वतीने सोयगाव नगरपंचायतीच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला, तसेच विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष श्रमदान करून शालेय परिसर चकाचक केला.

**स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सन्मान आणि श्रमदानातून विद्यार्थ्यांनी वाहिली संत गाडगेबाबांना आदरांजली**

गाडगेबाबांच्या वेशभूषेने वेधले लक्ष

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. यावेळी एका स्थानिक समाजसेवकाने गाडगे महाराजांची वेशभूषा परिधान करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांनी गाडगेबाबांच्या शैलीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले आणि जीवनात स्वच्छतेचा अंगीकार करण्याची प्रतिज्ञा दिली.




केवळ बोलून नव्हे तर कृतीतून समाजसेवा करणाऱ्या सोयगाव नगरपंचायतीच्या महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांचा यावेळी शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. शहराला स्वच्छ ठेवणाऱ्या या खऱ्या 'स्वच्छता दूतां'चा सत्कार करून शाळेने एक आदर्श पायंडा घालून दिला.

पूजन आणि सत्कार समारंभानंतर सर्व उपस्थित मान्यवर, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी हातात झाडू घेऊन संपूर्ण शालेय परिसर स्वच्छ केला. यावेळी विद्यार्थ्यांनी गाडगेबाबांचे अत्यंत प्रिय भजन गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला मोठ्या उत्साहात गायले. भजनाच्या गजराने संपूर्ण शाळा परिसर दणाणून गेला होता.

या प्रेरणादायी कार्यक्रमाला सोयगाव केंद्र प्रमुख फिरोज तडवी, समाजसेवक दत्तू रोकडे, विष्णू मापारी, दादू काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील, सुरेखा चौधरी, पंकज रगडे, मंगला बोरसे, रामचंद्र महाकाळ, सविता पाटील, गणेश बाविस्कर, प्रतिभा कोळी, अंकुश काळे, अनिल देसाई, विवेक महाजन, शुभम देसले आणि पूनम लाड यांच्यासह अंगणवाडी सेविका व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लासुर स्टेशन प्राथमिक आरोग्य केंद्रात जि.प. सदस्या संगीता आमराव यांची मध्यरात्री भेट; प्रसूतीसाठी आलेल्या महिलांची केली विचारपूस

**आत्ताच एक्सप्रेस**

**लासुर स्टेशन (प्रतिनिधी)** गंगापूर तालुक्यातील लासुर स्टेशन येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रसूतीसाठी दाखल झालेल्या महिलांच्या आरोग्याबाबत जिल्हा परिषद सदस्या संगीताताई संदीप आमराव यांनी दाखवलेल्या तत्परतेचे परिसरात कौतुक होत आहे.दिनांक २३ फेब्रुवारी रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास परिसरातील काही गर्भवती महिलांना प्रसूतीकळा सुरू झाल्या. त्यांच्या कुटुंबीयांनी अत्यंत तातडीने खासगी वाहनाद्वारे या महिलांना लासुर स्टेशन येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. रात्रीची वेळ असल्याने आणि प्रसूतीसारखा गंभीर विषय असल्याने जि.प. सदस्या संगीताताई आमराव यांनी माहिती मिळताच मध्यरात्री आरोग्य केंद्राला भेट दिली.या भेटीदरम्यान संगीताताईंनी केंद्रात दाखल असलेल्या प्रत्येक गर्भवती महिलेची प्रत्यक्ष विचारपूस करून त्यांना धीर दिला. त्यानंतर त्यांनी उपस्थित डॉक्टरांशी सविस्तर चर्चा केली.

# जलरक्षण हेच सृष्टीसंरक्षण: 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत जालना शहरात मुक्तेश्वर तलाव परिसराची स्वच्छता

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** भक्ती ही केवळ शब्दांत नव्हे, तर आचरणातून प्रकट व्हावी, हा उदात्त संदेश देत संत निरंकारी मिशनतर्फे देशभरात 'प्रोजेक्ट अमृत' हा उपक्रम राबवण्यात आला. या अभियानांतर्गत रविवारी, २२ फेब्रुवारी रोजी जालना येथील मुक्तेश्वर तलाव परिसरात भव्य स्वच्छता मोहीम राबवून 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' हा मंत्र जनमानसात रुजवण्यात आला.

**देशभरात १२ लाख स्वयंसेवकांचा सहभाग**

सतगुरू माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम भारतातील २५ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील ९३० शहरांत, एकूण १६०० हून अधिक ठिकाणी राबवण्यात आला. सुमारे १२ लाख स्वयंसेवकांनी या मोहिमेत श्रमदान केले. केवळ पर्यावरण संरक्षणच नव्हे, तर अध्यात्म, सेवा आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम या अभियानातून पाहायला मिळाला.जालना संत निरंकारी मंडळाच्या वतीने जुना जालना भागातील रेल्वे गेट जवळील मुक्तेश्वर तलाव परिसरात ही मोहीम राबवण्यात आली. या कार्यक्रमाला जालना महानगरपालिकेच्या महापौर वंदनाताई मगरे आणि उपमहापौर राजेशजी राऊत यांनी उपस्थित राहून स्वयंसेवकांचे कौतुक केले. याप्रसंगी नगरसेवक अशोक पांगारकर, संध्याताई देठे, डॉ. सीमाताई खरात, शशिकांत घुगे, संजय देठे व इतर सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंडळाचे जालना संयोजक श्री. राजकुमार पारसवाणी यांच्या देखरेखीखाली हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

**'प्रोजेक्ट अमृत'चा उद्देश**

बाबा हरदेव सिंहजी महाराज यांच्या शिकवणुकीतून प्रेरणा घेऊन संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन या सामाजिक शाखेने हा उपक्रम सुरू केला आहे. मानवाला निसर्गाबद्दल अधिक संवेदनशील बनवणे, जलस्रोतांचे जतन करणे आणि पर्यावरण संतुलनाचा सामूहिक संकल्प दृढ करणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे.

**सतगुरू माता सुदीक्षाजी महाराज यांचा संदेश**

या निमित्ताने दिल्ली येथे आयोजित विशेष सत्संगात माता सुदीक्षाजी महाराज म्हणाल्या की,खरी श्रद्धांजली ही शब्दांनी नव्हे, तर कृतीतून अर्पण केली जाते. बाबा हरदेव सिंहजी महाराज यांचे संपूर्ण आयुष्य मानवकल्याणासाठी समर्पित होते. प्रेम, सेवा, करुणा आणि समदृष्टी ही मूल्ये आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणणे हीच खरी भक्ती आहे.



**शिस्त आणि नियोजनाचा आदर्श**

या अभियानाची सुरुवात सेवादलाच्या प्रार्थनेने झाली. संपूर्ण मोहिमेत सुरक्षा, शिस्त आणि स्वच्छता यांना सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले होते. तलाव परिसरातील कचरा हटवून तो भाग पूर्णपणे स्वच्छ करण्यात आला. यासोबतच आयोजित खुल्या सत्संगाला भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.'स्वच्छ जल, स्वच्छ मन' हे अभियान केवळ एक उपक्रम नसून ती एक जीवनदृष्टी आहे. येणाऱ्या पिढ्यांसाठी सुरक्षित आणि शाश्वत भविष्याची पायाभरणी करणारा हा संकल्प जालन्यात यशस्वीपणे राबवण्यात आला.

## संक्षिप्त

### राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात 'भारतीय संविधानाची ७५ वर्षे' या विषयावर राष्ट्रीय परिषद

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/**येथील भगवान शिक्षण प्रसारक मंडळ गेवराई संचलित राष्ट्रमाता इंदिरा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जालना येथे 'मानव्य विज्ञान शाखेच्या' वतीने एका महत्त्वपूर्ण राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. 'भारतीय संविधानाची ७५ वर्षे: संधी आणि आव्हाने' हा या परिषदेचा मुख्य विषय असून, येत्या २८ फेब्रुवारी २०२६ रोजी ही परिषद पार पडणार आहे.

या एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेसाठी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कायदेतज्ज्ञ आणि विचारवंत उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून मुंबई येथील 'नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी'चे प्रो. डॉ. अमित कुमार हे आपले विचार मांडणार आहेत. तसेच, प्रमुख पाहुणे म्हणून छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयाचे सुप्रसिद्ध वकील ॲड. संतोष जाधव हे उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.या परिषदेचे अध्यक्षपद संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आणि प्रथम मंडळ स्तंभ निर्माते डॉ. नारायणराव मुंढे भूषविणार आहेत. महाविद्यालयाच्या प्रगतीशील वाटचालीत या परिषदेचे आयोजन एक मैलाचा दगड मानले जात आहे.

भारतीय संविधानाच्या प्रवासाचा आढावा घेण्यासाठी आणि वर्तमानातील आव्हानांवर चर्चा करण्यासाठी आयोजित केलेल्या या परिषदेचा लाभ समाजातील जास्तीत जास्त प्रतिष्ठित नागरिकांनी, अभ्यासकांनी आणि सर्व स्तरांतील नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन संस्थेचे उपाध्यक्ष सत्संग मुंढे साहेब आणि प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके यांनी केले आहे.

# दहेगाव खुर्द येथे 'आदर्श शिवजयंती उत्सव' मोठ्या उत्साहात संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड/प्रतिनिधी/**अंबड तालुक्यातील दहेगाव खुर्द येथे सोमवार, २३ फेब्रुवारी २०२६ रोजी 'आदर्श शिवजयंती उत्सव' अत्यंत उत्साही, शिस्तबद्ध आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. शिवस्वराज्य ग्रुप आणि समस्त ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सोहळ्याने संपूर्ण परिसरात सर्वांचे लक्ष वेधून घेतले.सोमवारी सकाळी ८ वाजता सोहळ्याचा प्रारंभ झाला. ढोल-ताशांच्या गजरात आणि 'जय भवानी, जय शिवाजी' च्या निनादात गावातून भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत अबालवृद्धांसह महिला व तरुणांनी पारंपारिक वेशभूषेत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. भगव्या ध्वजांनी अवघे दहेगाव खुर्द न्हाऊन निघाले होते.

या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे संघर्ष योद्धा मा. श्री. मनोजदादा जरांगे पाटील यांनी फोनद्वारे उपस्थितांशी साधलेला संवाद. त्यांनी आपल्या भाषणातून शिवजयंतीच्या शुभेच्छा देत, शिवरायांचे विचार आचरणात आणण्याचे आवाहन केले. त्यांच्या या अनपेक्षित संवादामुळे उपस्थित शिवप्रेमींमध्ये नवा उत्साह आणि चैतन्य संचारले होते.सायंकाळी ६ ते ८ या वेळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जाज्वल्य इतिहासातील विविध प्रसंगांना उजाळा देण्यात आला. मुलांनी सादर केलेल्या ऐतिहासिक नाटिका आणि पोवाड्यांनी उपस्थितांची मने जिंकली.रात्री ९ ते ११ या वेळेत आळंदी येथील प्रसिद्ध युवा कीर्तनकार ह.भ.प. दिनेश महाराज उंडे यांचे सुश्राव्य कीर्तन पार पडले. आपल्या ओघवत्या वाणीतून त्यांनी 'शिवरायांचे विचार आणि आजच्या काळातील समाजप्रबोधनाची गरज' यावर प्रभावी भाष्य केले. महाराजांचा इतिहास केवळ वाचण्यासाठी नसून तो जगण्यासाठी आहे, असा मोलाचा संदेश त्यांनी यावेळी दिला.

हा संपूर्ण उत्सव यशस्वी करण्यासाठी शिवस्वराज्य ग्रुप आणि दहेगाव खुर्द येथील ग्रामस्थांनी अहोरात्र परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे शिस्तबद्ध नियोजन आणि तरुणांचा सक्रिय सहभाग यामुळे हा 'आदर्श शिवजयंती उत्सव' खऱ्या अर्थाने सार्थ ठरला. गावातील ज्येष्ठ नागरिक आणि युवकांच्या समन्वयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मुख्य जलवाहिनीवरील लोखंडी गडरची चोरी; शहराचा पाणीपुरवठा धोक्यात

**आत्ताच एक्सप्रेस**


**जालना/ प्रतिनिधी/**शहराची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या मुख्य जलवाहिनीवर चोरट्यांनी डल्ला मारल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. जालना महानगरपालिकेच्या तांत्रिक साहित्याची चोरी झाल्याने नवीन जालना शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होण्याची चिन्हे आहेत. याप्रकरणी महानगरपालिकेने पोलीस ठाण्यात धाव घेतली असून अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जालना शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या संत गाडगेबाबा जलाशय (घाणेवाडी) ते जलशुद्धीकरण केंद्र यादरम्यान मुख्य पाईपलाईन टाकण्यात आली आहे. या पाईपलाईनच्या सुरक्षिततेसाठी आणि आधारासाठी 'कन्हैयानगर' भागातील नाल्यावरील पुलावर २० फुटांचे लोखंडी गडर बसवण्यात आले होते.२३ फेब्रुवारी २०२६ च्या रात्री अज्ञात चोरट्यांनी संधी साधून हे अवजड गडर चोरून नेले. चोरलेल्या या साहित्याचे वजन सुमारे दीड क्विंटल असून त्याची बाजारभावानुसार किंमत १५,००० रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे.

**मोठी दुर्घटना टळली, पण संकट कायम**

चोरीची ही घटना अतिशय धाडसी आणि तितकीच धोकादायक होती. चालू असलेल्या पाणीपुरवठा पाईपलाईनवरून हे गडर काढताना कोणतीही मोठी दुर्घटना घडून जीवितहानी होऊ शकली असती. सुदैवाने तसा प्रकार घडला नसला तरी, पाईपलाईनला असलेला आधार निघाल्याने तांत्रिक बिघाड होण्याची शक्यता बळावली आहे.

**पाणीपुरवठा विस्कळीत होण्याची शक्यता**

या चोरीचा थेट फटका नवीन जालना भागातील नागरिकांना बसण्याची शक्यता आहे. महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने दिलेल्या माहितीनुसार:गडर चोरीमुळे मुख्य जलवाहिनीवर तांत्रिक ताण निर्माण झाला आहे.यामुळे पाणी उपसा आणि वितरणात व्यत्यय येऊ शकतो. दुरुस्तीचे काम हाती घेईपर्यंत पाणीपुरवठा पूर्णतः बंद किंवा विस्कळीत राहण्याची भीती आहे.




**पोलीस कारवाई आणि प्रशासनाचे आवाहन**

या चोरीच्या प्रकारानंतर महानगरपालिका प्रशासनाने तातडीने पावले उचलली आहेत. चंदनझिरा पोलीस स्टेशन येथे अज्ञात चोरट्यांविरुद्ध फिर्याद देण्यात आली असून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. परिसरात सीसीटीव्ही फुटेजचा शोध घेतला जात असून संशयितांची चौकशी सुरू आहे.

सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे आणि शहराच्या अत्यावश्यक सेवेमध्ये अडथळा निर्माण करणे हा गंभीर गुन्हा आहे.नागरिकांनी अशा संशयास्पद हालचाली दिसल्यास तातडीने प्रशासनाला कळवावे.

**- पाणीपुरवठा विभाग, जालना मनपा**

# तांदुळवाडी येथे लोक अदालत व वाद निवारण शिबिर संपन्न; मत्स्योदरी विधी महाविद्यालयाचा पुढाकार




**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना(प्रतिनिधी)** मत्स्योदरी विधी महाविद्यालयाच्या विधी सहाय्य केंद्राच्या वतीने, राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन तांदुळवाडी येथे करण्यात आले आहे. या शिबिरात राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना यांच्या मार्गदर्शनाखाली 'लोक अदालत व तडजोडीने वाद निवारण' या विषयावर प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**गावातील वाद गावातच मिटवा: मान्यवरांचे आवाहन**

कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव मा. नितेश बंडगर यांच्या हस्ते झाले. यावेळी मार्गदर्शन करताना ड. महेश वाघुंडे (मुख्य लोक अभिरक्षक) म्हणाले की, पूर्वी गावातील पाच प्रतिष्ठित लोक एकत्र बसून वादाचे निवारण करत असत. तीच पारंपारिक संकल्पना आता 'लोक अदालत'च्या माध्यमातून अधिक कायदेशीर आणि यशस्वीरित्या राबवली जात आहे. शेतीचे बांध किंवा छोटेखानी वाद सामंजस्याने सोडवून गावात शांतता टिकवण्याचे आवाहन त्यांनी ग्रामस्थांना केले.तर सहाय्यक लोक अभिरक्षक ड. मौजूद शेख यांनी कायदा शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. कायद्याचे ज्ञान हीच खरी शक्ती आहे, असे सांगून त्यांनी युवकांनी आणि ग्रामस्थांनी आपल्या हक्कांप्रति जागरूक राहण्याचा सल्ला दिला.

**न्यायव्यवस्थेवरचा विश्वास वाढेल: कुलकर्णी एस. बी.**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका कुलकर्णी एस. बी. यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, अशा उपक्रमांमुळे न्यायव्यवस्थेबद्दल लोकांच्या मनात असलेला आदर आणि विश्वास अधिक वृद्धिंगत होईल.कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शेख टी. वाय. यांनी केले. लोक अदालत हा असा मंच आहे जिथे कोणाचाही पराभव होत नाही, तर सर्वांना न्याय मिळतो. ही पर्यायी न्यायव्यवस्था आपण घराघरात पोहोचवली पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.

**पथनाट्यातून 'बालविवाह' विरोधी जनजागृती**

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले पथनाट्य. 'वय खेळण्याचं, शिक्षा आयुष्यभराची' या विषयावर आधारित प्रभावी पथनाट्य सादर करून विद्यार्थ्यांनी बालविवाहासारख्या सामाजिक समस्येवर प्रकाश टाकला. 'बालविवाह मुक्त भारत' अभियानांतर्गत करण्यात आलेल्या या सादरीकरणाला ग्रामस्थांचा मोठा प्रतिसाद लाभला.या प्रसंगी तांदुळवाडीचे सरपंच मा. आनंद भिसे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष मा. गणेश भिसे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी प्रा. हंगरगे एस. डी. यांनी केले, तर आभार प्रा. देशमुख एस. व्हि. यांनी मानले.या शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रा. गोरे एस. जे., प्रा. पवार आर. पी., प्रा. जोशी व्हि. एस., प्रा. शेख एच. एम., कोकने सी. यू. यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



जालना शहरात शहर वाहतूक शाखा व पोलीस ठाणे यांची शहीदरीत्या वाहतूक नियम भंगाच्या केसेस अनुषंगाने विशेष मोहीम राबवण्यात आली यावेळी विविध भागात ट्राफिक पोलीस व पोलीस यांनी ट्रिपल सीट फोर व्हीलर ला असलेल्या फिल्म टू विलर ला नसलेल्या नंबर प्लेट्स व फॅन्सी प्लेट्स.छायाचित्र किरण खानापुरे



# उपविभागीय अधिकारी कार्यालय परतूर जि. जालना

संकेत स्थळ : www.jalna.nic.in
दूरध्वनी क्रमांक : ०२४८४-२२१००१
जा.क्र. २०२५/भूसंपादन//सीआर-

सत्यमेव जयते

Email ID : sdmparturgmail.com
फॅक्स क्रमांक : ०२४८४-२२१००१
दिनांक :- १०/०२/२०२६

**दुरुस्ती पत्रक :-**

ज्याअर्थी मौजे मंगरुळ ता. मंठा जि. जालना येथील जमीन निम्न दूधना प्रकल्पा करीता संपादीत करणे बाबत कार्यकारी अभियंता जालना पाटबंधारे विभाग जालना यांनी भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी जालना यांचे कार्यालया मार्फत या कार्यालयात सादर केला होता. सदर प्रकरणात या कार्यालयाने नियमानुसार संपादीत करावयाचे जमीनीची मोजणी करून घेऊन भूसंपादन कायदा २०१३ चे कलम ११ अन्वये अधिसूचना राजपत्रात, दोन स्थानिक वृत्तपत्रात व संबंधीत गावात प्रसिध्द केली होती. सदरची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात पान क्रमांक ०३ ते ०५ वर दिनांक ०२/०१/२०२५ रोजी प्रसिध्द झालेली आहे. सदर प्रकरणा जमीन मालक यांनी आक्षेप अर्ज सादर केल्यामुळे संपादीत जमीनीची फेर मोजणी करण्यात आली आहे. त्यानुसार खालील प्रमाणे दुरुस्ती वाचावी.

| करीता | | | वाचाव | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गट क्रमांक | संपादीत करावयाचे क्षेत्र हे.आर | अ.क्र | गट क्रमांक | संपादीत करावयाचे क्षेत्र हे.आर |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | - | - | 1 | 264 | 0.03 |
| 2 | 291 | 0.20 | 2 | 291 | 0.12 |
| 3 | 292 | 0.04 | 3 | 292 | 0.16 |
| 4 | - | - | 4 | 291 | 0.10 |
| 5 | - | - | 5 | 295 | 0.48 |
| 6 | 9 | 1.56 | 6 | 9 | 2.11 |
| 7 | - | - | 7 | 295 | 0.08 |
| 8 | 9 | 0.65 | 8 | 9 | 0.20 |

ठिकाण : परतूर
दिनांक : १०-२-२६

**सही/-**
**उपविभागीय अधिकारी**
**परतूर जि. जालना**

जा.क्र.जिमाका/जालना/जाहि./२०२६/१०१


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अ‍ॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813